सहपत्र-1

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

## आरोग्य विज्ञान विद्याशाखा

# इतिवृत्त

शुक्रवार दिनांक 07/10/2016 रोजी सकाळी 11.00 वाजता आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक आरोग्य विज्ञान विद्याशाखा सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खलील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. जयदिप निकम (संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा)
2. डॉ. राजेंद्र भांबर, प्राचार्य, पंचवटी फार्मसी कॉलेज नाशिक ,
3. डॉ. सुरेश महाजन, प्राध्यापक व विभाग प्रमुख, डॉ. वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक
4. डॉ. प्रमोद खंदारे, सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
5. डॉ. विजया पाटील,सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
6. प्रा. चेतना कमळस्कर, सहायक प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
7. प्रा. राम ठाकर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा
8. डॉ. अभय पाटील , सहायक प्राध्यापक आरोग्य विज्ञान विद्याशाखा

सदर बैठकीस खालील सदस्य त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव अनुपस्थित होते.

1. श्रीमती विद्युत राजहंस, प्राचार्य, एम ई एस कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पुणे
2. श्रीमती मालती डोंगरे, मेट्रन नर्सिंग विभाग, मेयो हॉस्पिटल, नागपूर
3. डॉ. विश्वास सापतणेकर, सापतणेकर हॉस्पिटल, लालबहादूर शास्त्री मार्ग, ठाणे

### विषय पत्रिका

या बैठकीमध्ये पुढील विषयांवर चर्चा करून ठराव / शिफारशी करण्यात येणार आहेत त्या पुढीलप्रमाणे:

**विषय क्रमांक बी-01/2016/09 : दिनांक 05 मे 2016 रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे....**

**टिप्पणी :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची या अगोदरची बैठक दिनांक 05 मे 2016 रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे इतिवृत्त सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आले आहे. या बैठकीतील इतिवृत्तास मान्यता मिळण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे.

( सहपत्र क्र.01)

**ठराव :** दिनांक 05 मे 2016 रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त आणि त्यावर केलेले कार्यवृत्त याला मंजुरी देण्यात आली.

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक बी-01/2016/10 : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ ( MPH ) अभ्यासक्रमाच्या 2016-17 प्रवेश प्रक्रियेबाबत..**

(**टिप्पणी** : सन 2016-2017 मधिल मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ ( MPH ) च्या आभ्यासक्रमाला दि. 05 जुलै 2016 च्या UGC व DEB च्या पत्रानुसार मंजुरी प्राप्त झाली.

या अभ्याक्रमाच्या प्रवेशासाठी MBBS, BAMS, BHMS, BUMS, BDS हे पदवी धारक प्रवेशास पात्र असुन त्यांची प्रवेश परीक्षा घेऊन या जागा भरण्यात येतात. परंतु या शैक्षणिक वर्षी 2016-2017 मध्ये UGC व DEB कडुन मिळालेल्या मान्यतेस उशिर झाल्यामुळे तसेच एम.के.सी.एल कडुन प्रवेश प्रक्रियेस उशिर झाल्यामुळे 2016-2017 मध्ये प्रवेश परीक्षा (Entrance Test) न घेता वरील प्रमाणे विद्याशाखेमधिल MBBS-20, BAMS-13, BHMS-13, BUMS-02, BDS-02 अशाप्रमाणे एकूण 50 विद्यार्थ्यांना सामाजिक आरक्षण ठेवुन विविध शाखानिहाय मेरीटप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता मिळणेबाबत)

सहपत्र क्र. 02

**ठराव** : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ ( MPH ) अभ्यासक्रमाच्या 2016-17 प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण 50 विद्यार्थ्यांना सामाजिक आरक्षण ठेवुन विविध शाखानिहाय मेरीटप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली.

**क्रमांक बी-01/2016/11 : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या B.Sc. (IDS) या अभ्यासक्रमाच्या शुल्क वाढीबाबत....**

(**टिप्पणी** : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या B.Sc. (IDS) हा अभ्यासक्रम लुपिन लि. कंपनी यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारान्वये राबविला जातो. सदर अभ्यासकेंद्राशी झालेल्या चर्चेनुसार B.Sc. (IDS) या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क वाढीबाबत चर्चा करण्यात आली पुढीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता मिळणेबाबत. सदर वाढ शैक्षणिक वर्ष 2016-2017 पासुन करण्याचे ठरविण्यात आले आहे.)

सहपत्र क्र. 03

**ठराव** : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या B.Sc. (IDS) या अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या शुल्क वाढीबाबत सन 2016-2017 पासुन पुढीलप्रमाणे वाढ करण्यास सहमती दर्शवली आहे.

| | | | जुने शुल्क | नवीन शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1. | FY. B.Sc (IDS) | = | 12000 | 15000/- |
| 2. | SY. B.Sc (IDS) | = | 12000 | 15000/- |
| 3. | TY. B.Sc (IDS) | = | 13000 | 16000/- |

संचालक तथा अध्यक्ष
आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद

Scanned with CamScanner